महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
समग्र शिक्षा

**महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई**

जा.क्र.मप्राशिप/सशि/यु-डायस/संगणक/२०२४-२५/3488 दिनांक : 26 NOV 2024

प्रति,

१) आयुक्त,
महानगरपालिका, सर्व.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व.

विषय: सर्व विद्यार्थ्यांना APAAR आयडी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने दि. २९ व ३० नोव्हेंबर, २०२४ रोजी 'APAAR दिवस' साजरा करणेबाबत.

संदर्भ : १) भारत सरकार, शिक्षा मंत्रालय यांचे पत्र क्र. D.O. No.१-२७/२०२३-DIGED-Part (१) दि. ०२/०९/२०२४.
२) कार्यालयाचे जा.क्र. मप्राशिप/सशि/यु-डायस/संगणक/२०२४-२५/२८८१ दि. २५/०९/२०२४.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना APAAR आयडी उपलब्ध करून देण्याचा राष्ट्रीय उपक्रम सुरु केला आहे. दि. २५ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत राज्यातील ६५ (३१%) लाख विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापकांकडून APAAR आयडी उपलब्ध करून देण्यात आला आहे. केंद्र शासनाकडून दि. ३० नोव्हेंबर, २०२४ पर्यंत सर्व विद्यार्थ्यांना APAAR आयडी उपलब्ध करून देण्याकरिता केंद्र शासनाकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

केंद्र शासनाचे निर्देश विचारात घेवून राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना APAAR आयडी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने दि. २९ व ३० नोव्हेंबर, २०२४ रोजी राज्यातील सर्व व्यवस्थापन / सर्व माध्यमांच्या शाळेमध्ये 'APAAR दिवस' साजरा करण्यात यावा.

- सदर दिवशी APAAR आयडी बनविण्यासाठी सर्व शाळांमध्ये विशेष मोहिम राबविण्यात यावी.
- जिल्हा स्तरावरून APAAR आयडीबाबत शाळेच्या मुख्याध्यापक यांची ऑनलाईन आढावा बैठक आयोजित करून सर्व शाळांचा आढावा घेवून संबंधितांना सूचना दयावा.


जवाहर बाल भवन, पहिला मजला, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड (प.), मुंबई - ४०० ००४.
टेलिफोन नं. : ०२२-२३६३ ६३१४, २३६७ ९२६७, २३६७ १८०८, २३६७ १८०९, २३६७ ९२७४
ई-मेल : mpspmah@gmail.com, samagra-shiksha@mahedu.gov.in
संकेतस्थळ - https://samagrashiksha.maharashtra.gov.in, https://mpsp.maharashtra.gov.in

- दि. २९ व ३० नोव्हेंबर, २०२४ रोजी प्रशासनाधिकारी मनपा, गटशिक्षणाधिकारी यांनी विस्तार अधिकारी केंद्र प्रमुख यांनी शाळा भेटीचे नियोजन करून APAAR आयडी तयार करण्याची कार्यवाहीचा आढावा घ्यावा.
- सर्व जिल्ह्यांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचे APAAR आयडी उपलब्ध करून देण्याबाबत विशेष प्रयत्न करावे.

26/11/24

(आर. विमला, भा.प्र.से.)
राज्य प्रकल्प संचालक,
म.प्रा.शि.प., मुंबई.

प्रत : माहितीस्तव सविनय सादर,
मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत : उचित कार्यवाहीस्तव –

१) मा. आयुक्त शिक्षण, शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सर्व.
५) शिक्षणाधिकारी (माध्यमिक व उच्च माध्यमिक), जिल्हा परिषद, सर्व.
६) शिक्षणाधिकारी/प्रशासनाधिकारी, महानगरपालिका, सर्व.
७) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व).
८) मुख्याध्यापक (सर्व शाळा).

X:\computer doc\U-DISE 2024-25\APAAR\6_Letter_Sajara.docx